**नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६**
**सरकार वि. दादासाहेब वगैरे**
**निशाणी ६१**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– आशिष संपत सोहनी
**वय** :– २९ वर्षे, **धंदा** :– नोकरी
**राहणार** :– गोमेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए.पी.केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत**

**०१.** माझ्या घरी मी, माझी पत्नी, आई–वडील, भऊ असे एकत्र राहतो. मी जन्मापासून गोमेवाडी येथे राहतो. दिनांक १५/०९/२०१६ आणि १६/०९/२०१६ या दिवशी आमच्या गावात गणपतीनिमीत्त कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

**०२.** दि. १६/०९/२०१६ रोजी मी व माझा मित्र विक्रम श्रीकांत देवकुळे असे गणपती मंदीराजवळ संध्याकाळी ७.०० च्या सुमारास गेलो होतो. त्याठिकाणी प्रदीप सरगर हा उभा होता. प्रदीप सरगर याने आम्हाला विचारले की, तुम्ही इथे का थांबला आहात, असे म्हणून शिवीगाळ केली. आम्ही त्याला म्हणालो की, शिव्या देवू नको, आम्ही जातो. त्यावर प्रदीप सरगर याने विक्रम देवकूळे याच्या कानाखाली मारली, लाथाबुक्कयांनी मारहाण केली. मी सोडवासोडव करुन घरी जात असताना प्रदिप सरगर, दादासाहेब वसंत पाटील, प्रविण बबन गाडगे, सचिन वसंत पाटील आले. प्रदीप सरगर याने तुम्हाला मस्ती आली का असे म्हणून प्रदिप सरगर, दादासाहेब वसंत पाटील, प्रविण बबन गाडगे, सचिन वसंत पाटील यांनी आम्हाला खाली पाडून लाथाबुक्कयांनी मारहाण केली. त्यानंतर दादासाहेब पाटील यांनी त्यांच्या कंबरेचा चाकू काढून माझ्या डाव्या हाताच्या पोटरीवर मारला. त्यामुळे त्या जखमेतून रक्त येत होते. नंतर रक्त येउ लागल्याने माणसे जमा झाली. त्यानंतर नाना तुकाराम आवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे आणि समाधान आवळे यांनी भांडणाची सोडवासोडव केली.

०३. त्यानंतर प्रदिप सरगर, दादासाहेब वसंत पाटील, प्रविण बबन गाडगे अशांनी तुम्ही आता वाचलाय, नंतर तुम्हाला सोडणार नाही अशी धमकी दिली. त्यानंतर आम्ही आटपाडी पोलीस स्टेशनला आलो. तेथून मला सरकारी दवाखाना आटपाडी येथे पाठविले. त्यानंतर मी फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ६२** देण्यात येते. मला ज्या चाकुने मारले तो चाकू पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला ज्या चाकूने मारले तो चाकू दाखविण्यात आला. तो तोच चाकू आहे. जप्त चाकूस **आर्टिकल अ** देण्यात येते. मी सर्व आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. ते आज न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री. डी. व्ही. शिंदे, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

०४. हे म्हणणे खरे आहे की, गोमेवाडी हे एक छोटे खेडेगाव आहे. मी बौद्ध समाजाचा आहे. आरोपी हे धनगर व मराठा समाजाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी राहतो त्याठिकाणी आमच्या समाजाची अनेक घरे आहेत. नाना तुकाराम आवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे आणि समाधान आवळे हे बौद्ध आणि मातंग समाजाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही सर्व मागासवर्गीय समाजाचे आहोत. हे म्हणणे खरे आहे की, नाना तुकाराम आवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे आणि समाधान आवळे हे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी गोमेवाडी–करगणीच्या सीमेवर असलेल्या पूजा बार मध्ये नोकरीस होतो. मी त्यावेळी श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय आटपाउी येथे अकरावी कॉमर्स मध्ये शिक्षण घेत होतो. गोमेवाडी ते आटपाडी हे २१ कि.मी. अंतर आहे आणि सदर अंतर दुचाकीवरुन जाण्यास अर्धा तास लागतो. मी त्यावेळी मोबाईल वापरत नव्हतो. ९१३०९५२७२१ हा क्रमांक मी फिर्याद देताना पोलीसांना दिला होता. नाना तुकाराम आवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे आणि समाधान आवळे हे त्यावेळी मोबाईल वापरत होते.

०५. आरोपी आमच्या शेजारी राहणारे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सचिन पाटील हे जिल्हा परिषदेमध्ये नोकरी करतात आणि उर्वरित आरोपी शेती करतात. असे

घडले नव्हते की, आरोपींचे व माझे पूर्वी भांडण झाले होते व मी पोलीस स्टेशनला त्यांच्याविरुद्ध तक्रार दिली होती. असे नव्हते की, माझे व आरोपींचे पूर्वी व्यवहार होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी प्रदीप आणि प्रविण हे शेतीबरोबर बदली ड्रायव्हर म्हणून काम करायचे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी प्रदिप व प्रविण ब–याचवेळा गाडी घेवून बाहेर जायचे. हे म्हणणे खरे आहे कीख् आरोपी दादासाहेब त्यावेळी गावातील विकास सोसायटीचे चेअरमन होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दादासाहेब व आरोपी सचिन हे दोघे सख्खे भाउ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दादासाहेब हे गावातील राजकारणामध्ये सक्रीय होते.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीर हे गावातील मध्यवर्ती ठिकाणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीराच्या आजुबाजूला ब–याच लोकांची लागून लागून घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या घरामधून गणपती मंदीरासमोरील परिसर आणि येणारे–जाणारे लोक दिसतात. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीर हे जुन्या बाजारपेठेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीरासमोरुन जाणारा रस्ता पूर्व–पश्चिम चालीचा असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर पूर्व–पश्चिम रस्ता त्यावेळी सिमेंट कॉक्रीटचा होता व त्याची रुंदी दहा फुट असावी. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीराला लागून चंद्रकांत जमदाडे, मुगाबाई घाडगे यांची राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, यात्रेच्यावेळी संध्याकाळी गणपती मंदीरात शेकडो लोकांची ये–जा, वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर यात्रेनिमीत्ताने वेगवेगळे स्टॉल व फेरीवाले असतात. हे म्हणणे खरे आहे की, त्याठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त यात्रेच्या दरम्यान असतो. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीरासमोर लोकांची गर्दी रात्री उशिरापर्यंत असते. हे म्हणणे खरे आहे की, यात्रेच्या निमीत्ताने वेगवेगळे मनोरंजनाचे कार्यक्रम यात्रा कमिटीमार्फत आयोजीत केलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीराच्या पाय–यांना लागून नारळ विक्रेत्यांचे स्टॉल असतात. हे म्हणणे खरे आहे की, मंदीराचा परिसर छोटा असल्याने मंदीरात जाणारे व मंदिरातून येणा–यांची रांग रस्त्यापर्यंत असते.

**नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६**
**सरकार वि. दादासाहेब वगैरे**
**निशाणी ६१**

०७. असे घडले नव्हते की, तथाकथीत घटनेच्या पूर्वी दिवसभरात माझी आणि आरोपी प्रदिप सरगर याची वादावाद झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे प्रदिप सरगरने मला शिवी देण्याचे काही कारण नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यासारखी गावातील अनेक माणसे आमच्या आजूबाजूला उभी होती. हे म्हणणे खरे आहे की, येणारे–जाणारे लोक माझ्या ओळखीचे होते. असे घडले नव्हते की, विक्रमची गाडी कोणाच्या तरी गाडीला घासली होती व त्यावरुन वाद झाला होता. असे घडले नाही की, ज्यावेळी प्रदीप शिवीगाळी करीत होता त्यावेळी मी विक्रमला विचारले की, तुझा आणि प्रदीपचा काही वाद झाला होता का. माझ्या म्हणण्याप्रमाणे प्रदीपने दोन ते तीन मिनीटे शिवीगाळ केली असावी. असे घडले नाही की, त्यादरम्यान बाजूला उभे असलेले लोक मध्ये आले व त्यांनी सोडवासोडव केली. असे घडले होते की, हा प्रकार गावातील मंदीराजवळील लोकांनी पाहिला होता. असे घडले नव्हते की, विक्रमला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केलयामुळे त्याचे कपडे फाटले होते, त्याला जखमा झाल्या होत्या. तथाकथीत शिवीगाळ व लाथाबुक्कयांनी मारहाण करणे हा माझ्यावर अन्याय झाला असे मला वाटले होते. असे घडले नाही की, त्यावेळी बंदोबस्तातील पोलीसांकडे जावून किंवा मोबाईलद्वारे सदर घटनेची माहिती आटपाडी पोलीस स्टेशनला दिली होती.

०८. असे घडले नाही की, पहिली घटना झाल्यानंतर किती वेळाने दुसरी घटना घडली याची माहिती पोलीस स्टेशनला दिली नाही. असे घडले नाही की, दुसरी तथाकथीत घटना गणपती मंदीराजवळ घडली होती. माझे राहते घर ते गणपती मंदीर हे अंतर अंदाजे दोनशे ते तीनशे मिटर असावे. असे घडले नाही की, दुसरी तथाकथीत घटना माझ्या घरासमोर घडली होती असे तक्रार देताना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर ते गणपती मंदीर या रस्त्यावर लोक ये–जा करीत असतात. असे मी फिर्याद देताना पोलीसांना सांगितले नव्हते की, दुसरी तथाकथीत घटना आबा जाधव यांच्या घरासमोर व गणपती मंदीराजवळ घडली होती. गणपती मंदीर ते आबा जाधव

यांच्या घरादरम्यान दहा फुटाचा रस्ता आहे. असे घडले होत की, तपासादरम्यान दुसरी घटना कोठे घडली होती ते ठिकाण मी पोलीसांना दाखविले होते. असे घडले होती की, त्या ठिकाणाचा पोलीसांना पंचनामा केला होता. असे झाले नाही की, पंचनाम्याच्यावेळी मी पोलीसांना आबा जाधव यांच्या घरासमोर आणि गणपती मंदीराजवळचे ठिकाण दाखविले होते आणि पोलीसांनी तसे लिहले नव्हते. मी दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर पोलीसांनी मी दाखविलेल्या जागेचा पंचनामा केला नाही म्हणून त्यांच्या विरुध्द तक्रार केली नाही. माझ्या म्हणण्याप्रमाणे दुसरी तथाकथीत घटना आबा जाधव यांच्या घरासमोर घडली नव्हती.

०९. असे घडले होते की, दुस–या तथाकथीत घटनेच्यावेळी म्हणजे आम्हाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करतेवेळी गावातील लोक तेथे जमले होते. त्या लोकांमध्ये आमच्या ओळखीचे लोक होते. हे म्हणणे खरे आहे की, तुकाराम आवळे, रमाकांत, सतिश व समाधान आवळे यांना सोडून इतर लोक आमच्या ओळखीचे होते. असे घडले नव्हते की, फिर्याद देताना दादासाहेब पाटील यांनी माझ्या हातावर एक सोडून अनेक वार करुन जखमा केल्या होत्या असे सांगितले नव्हते. असे घडले होते की, जखमेतून येणारे रक्त माझ्या कपडयांना लागले होते. असे घडले होते की, मी ज्याठिकाणी उभा होतो त्याठिकाणी माझ्या जखमेतून येणारे रक्त सांडले होते. माझ्या म्हणण्याप्रमाणे दुसरी तथाकथीत घटना ही पाच ते दहा मिनीटे चालली असावी. हे म्हणणे खरे आहे की, दुस–या तथाकथीत घटनेच्यावेळी इतर लोकांप्रमाणे आमच्या समाजातील लोक जमा झाले होते. असे घडले नव्हते की, त्यावेळी तेथे पोलीस आले होते. असे घडले नाही की, त्यावेळी आम्ही पोलीसांकडे गेलो व मदत मागितली होती. असे घडले नव्हते की, जमा झालेल्या लोकांनी आरोपींना पकडून ठेवले व पोलीसांना बोलाविले होते. असे घडले नव्हते की, घटनेनंतर त्वरीत मोबाईलवरुन पोलीसांना कळवून बोलावून घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत दुस–या घटनेनंतर देखील देवदर्शन सुरु होते व यात्रा चालू होती. साक्षीदार सांगतात की, मनोरंजनाचा कार्यक्रम रद्द झाला होता. असे घडले नव्हते की, घटना घडल्यानंतर लगेच घटनास्थळी

पोलीस आले होते.

**१०.** मी पोलीस स्टेशनला ७.४५ च्या आसपास पोहचलो असावा. त्यावेळी माझ्यासोबत माझे आई–वडील, मित्र व आमच्या समाजातील लोक माझ्यासोबत होते. असे घडले होते की, जाताना माझे व माझ्या आई–वडीलांमध्ये तक्रार देण्याबाबत चर्चा झाली होती. असे घडले की, पोलीस स्टेशनला गेल्यानंतर पोलीसांनी माझ्याकडे चौकशी न करता मला लगेच दवाखान्यात पाठविले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशन व सरकारी दवाखाना आटपाडी जवळ जवळ आहेत. मी दवाखान्यात गेल्यांनतर डॉक्टरांनी मला काय लागले व कशाने लागले याबाबत माझ्याकडे चौकशी केली होती. मी जे डॉक्टरांना सांगितले होते ते डॉक्टरांनी लिहून घेतले होते. मला डॉक्टरांनी असे विचारले नाही की, कोणी मारहाण केली. असे घडले होते की, मला धारधार चाकूने मारहाण झाली होती असे डॉक्टरांना मी सांगितले होते.

**११.** असे घडले होते की, माझ्या हातावरील जखमा कापीव झाल्या होत्या. असे घडले नव्हते की, हातावर खोल जखमा झाल्या होत्या. असे घडले होते की, तथाकथीत घटनेमध्ये विक्रम याला मार लागला होता. साक्षीदार सांगतात की, मुक्का मार लागला होता. असे घडले होते की, मला मुक्का मार लागला होता. असे घडले होते की, मुक्का मार माझ्या सर्व अंगाला लागला होता. असे घडले होते की, मी ज्यावेळी पोलीस स्टेशनला गेलो त्यावेळी विक्रम माझ्यासोबत आला होता. असे घडले नाही की, माझ्यासमोर पोलीसांनी विक्रमकडे घटनेबाबत चौकशी केली होती. असे घडले नाही की, विक्रमने त्याला मारहाण झाल्याचे माझ्यासमक्ष पोलीसांना दवाखान्यात जाण्यापूर्वी सांगितले होते. असे घडले नाही की, माझ्याप्रमाणेच विक्रमला यादी दिली होती आणि तो माझ्याबरोबर दवाखान्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, विक्रमने दवाखान्यात उपचार घेतले नव्हते.

**१२.** मी दवाखान्यामध्ये पाच मिनीटे होतो. असे घडले होते की, दवाखान्यातून मी लगेच पोलीस स्टेशनला आलो. मी दवाखान्यातून पोलीस स्टेशनला आल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये माझ्यासोबत विक्रम होता. असे घडले होते की, मी

दवाखान्यातून आल्यानंतर विक्रमकडे पोलीसांनी चौकशी केली होती. हे माझ्या लक्षात नाही की, माझ्यासमक्ष पोलीसांनी विक्रमचा जबाब लिहून घेतला होता किंवा कसे. असे घडले नव्हते की, नाना, रमाकांत, सतिश, समाधान, माझ्यासोबत पोलीस स्टेशनल आले होते. मी पोलीस स्टेशनमध्ये एक ते दिड तास थांबलो होतो. मी घरी अंदाजे दहा च्या आसतास गेलो असावा.

१३. हे म्हणणे खरे आहे की, बाजारामध्ये वेगवेगळया आकाराचे सु–या व चाकू वेगवेगळया मुठीचे मिळतात. असे घडले नव्हते की, मी फिर्याद देताना पोलीसांना चाकूचे वर्णन सांगितले होते. असे घडले नाही की, पोलीसांनी मला नंतर पोलीस स्टेशनला बोलावून मला चार पाच चाकू दाखवून, चाकू ओळखायला लावला होता. हे म्हणणे खरे आहे की, आई–वडीलांबरोबर चर्चा झाल्याप्रमाणे फिर्याद दिली होती.

१४. हे मला माहिती नाही की, आमच्या गावामध्ये आमच्या समाजाचे लोक गाडया पळवितात, मुलींची छेड काढतात अश्या तक्रारी ग्रामस्थांच्या होत्या किंवा कसे. हे मला माहिती नाही की, यात्रेच्यापूर्वी साक्षीदारांच्या विरुद्ध अशा प्रकारच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या होत्या किंवा कसे. हे मला माहिती नाही की, घटनेच्या दिवशीसुद्धा अशा प्रकारच्या घटना ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्या होत्या किंवा कसे. हे मला माहिती नाही की, अशा तक्रारींमुळे ग्रामस्थांनी तहसीलदार आणि आटपाडी पोलीस स्टेशन यांना सह्या करुन निवेदन दिले होते किंवा कसे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६/०९/२०१६ रोजी प्रदिप सरगर याने मला व विक्रम याला शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सोडवासोडव करुन घरी जात असताना प्रदिप सरगर, दादासाहेब वसंत पाटील, प्रविण बबन गाडगे, सचिन वसंत पाटील आले, प्रदीप सरगर याने तुम्हाला मस्ती आली का असे म्हणून प्रदिप सरगर, दादासाहेब वसंत पाटील, प्रविण बबन गाडगे, सचिन वसंत पाटील यांनी आम्हाला खाली पाडून लाथाबुक्कयांनी मारहाण केली, त्यानंतर दादासाहेब पाटील यांनी त्यांच्या कंबरेचा चाकू

काढून माझ्या डाव्या हाताच्या पोटरीवर मारला, त्यामुळे त्या जखमेतून रक्त येत होते, नंतर रक्त येउ लागल्याने माणसे जमा झाली, त्यानंतर नाना तुकाराम आवळे, रमाकांत सोहनी, सतिश देवकुळे आणि समाधान आवळे यांनी भांडणाची सोडवासोडव केली, त्यानंतर प्रदिप सरगर, दादासाहेब वसंत पाटील, प्रविण बबन गाडगे अशांनी तुम्ही आता वाचलाय, नंतर तुम्हाला सोडणार नाही अशी धमकी दिली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला किंवा विक्रमला आरोपींनी कधीही शिवीगाळ व मारहाण केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला झालेल्या हातावरील जखमा 'आर्टिकल अ' या चाकूने झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल अ–चाकू गुन्हयात वापरलेला होता असे मी खोटे सांगत आहे.

**१६.** असे घडले नाही की, तपासादरम्यान मी पोलीसांना तथाकथीत घटनेच्या दिवशी घातलेले कपडे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला आणि आमच्या समाजातील लोकांविरुध्द तशा प्रकारच्या तक्रारी आरोपीच्या सांगण्यावरुन होत होत्या असा माझा संशय होता. हे म्हणणे खरे नाही की, मला हातावर झालेल्या जखमा या दैनंदिन कामकाजामुळे झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मला झालेल्या जखमा मी स्वतः करुन घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्या जखमांचा आधार घेवून आणि गावातील स्थानिक राजकारणावरुन व आमच्या समाजातील लोकांच्या सांगण्यावरुन मी आरोपींविरुद्ध खोटी तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी तक्रार खरी आहे असे भासविण्याकरीता मी आमच्या समाजातील लोकांना साक्षीदार म्हणून सामील केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद देवून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

सही/–

दि.३१ /०१/२०२५ — ( आर. बी. कुलकर्णी )

आटपाडी. — सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,आटपाडी